राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदांच्या
मुख्य व उपमुख्य अग्निशमन अधिका-यांची पदे
भरण्याच्या प्रक्रियेबाबत

# महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक : क्र.अशस १४०७/३९५/प्र.क्र.११७/०७/नवि-२४**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ०७.०२.२००८**

वाचा :
१. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४, दिनांक ४ मे, २००६.
२. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एमसीओ १२०३/१२४६/प्र.क्र.१७५/०३/नवि-१४, दिनांक ११ जानेवारी, २००७.
३. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणीबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.१३२/अस, दिनांक २२ मार्च, २००७

**प्रस्तावना :** महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०५.०२.२००७ अन्वये राज्यामध्ये **महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६** अस्तित्वात आला असून त्याची अंमलबजावणी लवकरच होणार आहे. सदर अग्निशमन कायदा प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी संवर्गात अग्निशमन अधिकारी पार पाडणार आहेत. म्हणून शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४, दिनांक ४ मे, २००६ नुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवेतील अधिकारी पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून त्यांचा स्वतंत्रपणे सवर्ग तयार करण्यात येणार आहे. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एमसीओ-१२०३/१२४६/सीआर-१७५/०३/नवि-१४, दि.११.०१.२००७ नुसार राज्यातील नगर परिषदांच्या अग्निशमन सेवेतील अधिका-यांचा सवर्ग तयार करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदातील रिक्त पदे नियुक्तीने / पदोन्नतीने भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :** बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा यांच्या आस्थापनेवरील मुख्य अग्निशमन अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी अथवा अग्निशमन सेवा प्रमुख ही पदे भरण्याकरीता सेवा भरती नियम मंजूर होईपर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(अ) मुख्य अग्निशमन अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी अथवा अग्निशमन सेवा प्रमुख ही पदे सरळ सेवा भरतीने भरावयाची प्रक्रीया त्वरीत थांबविण्यात यावी.

(ब) जी पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत त्यांच्या बाबतीत सदर अधिकारी शासकीय संवर्गात सामाविष्ठ होण्यास इच्छूक आहे का? असे त्याला लेखी कळवून ज्यांची शासकीय संवर्गात सामाविष्ठ होण्यास संमती आहे व त्यांच्याकडून संवर्गात सामाविष्ठ होण्याबाबतचे हमीपत्र घेतल्यावर त्याची शैक्षणिक व तांत्रिक अर्हता प्रस्तावित सेवा भरती नियमांना अधीन आहे असे पदोन्नतीचे प्रस्ताव संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणीबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचेकडून मंजूरी घेवून पदोन्नती देण्यात यावी.

०४. **महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६** ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने राज्यात अग्निशमन अधिका-यांच्या संवर्गाची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदांनी सदर शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.**

**( म.दि.आडिवरेकर )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबइ-४०० ०३२.
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आणीबाणी सेवा तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन,
व्दारा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.
आयुक्त तथा संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय, मुंबई-४०० ०३०.
सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन,
सर्व जिल्हाधिकारी (नगरपालिका प्रशासन शाखा)
सर्व महापालिका आयुक्त.
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा.
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
महालेखापाल-१ / २, मुंबई / नागपूर.
नगर विकास विभागातील सर्व सहसचिव, उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी.
निवड नस्ती (नवि-२४)

------

H-2241-1a.